# नहर-ए-अंबरी याचिकेत १६ नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्यास वेळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : नहर-ए-अंबरी** व नहर-ए-पाणचक्कीबाबत 'अवमान याचिके'च्या अनुषंगाने औरंगाबाद खंडपीठाचे न्या. रवींद्र बोर्डे व न्या. विभा कंकणवाडी यांनी शहरातील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी दाखल करून घेतलेल्या 'सुमोटो याचिकेत' महापालिका व राज्य शासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. उपरोक्तप्रकरणी माहिती सादर करण्यासाठी खंडपीठाने प्रतिवादींना १६ नाव्हेंबरपर्यंतची मुदत दिली आहे.

शहरातील नहर-ए-अंबरी आणि नहर-ए-पाणचक्की या दोन्ही नहरी या पुरातत्वीय वारसा आहेत. त्यांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे मुद्दे याचिकेत मांडण्यात आले आहेत. वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित झाल्याने औरंगाबाद खंडपीठाने स्वत:हून त्यांची दखल घेत 'सुमोटो याचिका' दाखल करून घेतली आहे. दोन्ही नहरींचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासंदर्भात योजना आखण्याचे निर्देशही खंडपीठाने यापूर्वी दिले आहेत.

गुरुवारी (९ नोव्हेंबर) याचिका सुनावणीस निघाली असता केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल संजय देशपांडे यांनी बेगमपुरा येथील थत्ते हौदासंबंधी माहिती दिली. उपरोक्त परिसर वारसा स्थळ यादीत टाकण्यासाठी लोकप्रतिनिधींचा विरोध आहे. स्थानिक नागरिकांनीही त्यास विरोध दर्शविला आहे. सदर स्थळ एकदा वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केल्यास संबंधित वास्तूच्या शंभर मीटर परिसरात कुठल्याही प्रकारचे बांधकाम करता येत नसल्याचे त्यांनी खंडपीठात स्पष्ट केले. अवमान याचिकेच्या अनुषंगाने मनपा आयुक्तांऐवजी शहर अभियंता सखाराम पानझडे यांनी खंडपीठात शपथपत्र दाखल केल्याचे अ‍ॅड. दक्षिणी यांनी यापूर्वीच्या सुनावणीत खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले होते. कंत्राटदाराला नहर तोडण्याची परवानगी दिली नसल्याचे मनपा आयुक्तांनी निवेदन केले होते, तर कंत्राटदाराला नहर तोडण्याची परवानगी दिली असल्याचे पानझडे यांनी शपथपत्रात म्हटले आहे. नहर-ए-पाणचक्की ही वक्फची मालमत्ता असल्याचेही त्यांनी शपथपत्रात म्हटल्याचे निदर्शनास आणून दिले होते. सुमोटो याचिकेत न्यायालयाचे मित्र म्हणून अ‍ॅड. प्रदीप देशमुख काम पाहत आहेत. महापालिकेची बाजू अंजली दुबे-वाजपेयी यांनी मांडली.




### अभियांत्रिकी : पैसे द्या, रेडिमेड प्रॅक्टिकल घ्या; ५ ते १२ रुपये प्रतिपेज

# 'प्रॅक्टिकल'चा गोरखधंदा

राम शिनगारे | लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, पदविका, औषधनिर्माण, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या काही विषयांना ५० गुणांचे प्रॅक्टिकल (प्रात्यक्षिक) असते. हे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी स्वत: तयार करणे बंधनकारक असते. मात्र, विद्यार्थी संबंधित सत्राचे सर्व प्रात्यक्षिक झेरॉक्स सेंटर, डीटीपी दुकानातून खरेदी करीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हे प्रात्यक्षिक खरेदी करण्यासाठी मुंबई, पुणे येथीलसुद्धा अभियांत्रिकीचे विद्यार्थी औरंगाबादेत येत असल्याचे स्पष्ट झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा काही दिवसांनंतर होणार आहेत. या परीक्षेपूर्वी तीन विषयांना असणारे ५० गुणांचे प्रॅक्टिकल पूर्ण करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. यात विषयानुसार सर्किट, थेअरी, डायग्राम, इन्स्ट्रुमेंट, इनपुट, आऊटपुट, स्ट्रक्चर, पॉवर डायग्राम, अशा विविध प्रकारचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना लेखी स्वरुपात संबंधित महाविद्यालयांमध्ये तयार करून द्यावे लागते. यासाठी आवश्यक असलेल्या सूचना महाविद्यालयांतील प्राध्यापक विद्यार्थ्यांना देतात. हे प्रॅक्टिकल तयार करण्यासाठी नमुनासुद्धा देण्यात येतो. विद्यार्थी हाच नमुना झेरॉक्स सेंटर, डीटीपी दुकानदारांना देतात. त्यानुसार दुकानदार विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे रेडिमेड प्रॅक्टिकल देतात. या प्रॅक्टिकलचा दर हा प्रतिपेज ५ ते १२ रुपये याप्रमाणे आहे. हा दर पूर्वी ८ ते १५ रुपये होता. विद्यार्थ्यांना कोणतेही कष्ट न करता तीन विषयांचे रेडिमेड प्रॅक्टिकल तीन ते चार हजार रुपयांमध्ये तयार करून मिळते. एका महाविद्यालयातील प्रत्येक सत्रातील किमान १०० पेक्षा अधिक विद्यार्थी रेडिमेड प्रॅक्टिकलच दाखल करतात, अशी माहिती एका विद्यार्थ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली. विविध महाविद्यालयांतील हा आकडा काही हजारांमध्ये आहे.

**अपडेट माहितीचा खजिना**

तयार प्रॅक्टिल देणाऱ्या दुकानदार, झेरॉक्सवाल्यांकडे सर्व अभ्यासक्रमांची अपडेट माहिती आहे. विद्यार्थ्यांनी त्यांना साहित्य मागण्यापूर्वीच ते सल्ला देतात. त्यात बदल कसा करायचा हेसुद्धा सांगतात, अशी माहिती समोर आली आहे.

### नोकरी न मिळण्याचे महत्त्वाचे कारण

◆ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी रेडिमेड प्रॅक्टिल दाखल करीत असतील. मात्र, त्यापेक्षा गंभीर बाब ही शेवटच्या सत्रातील प्रोजेक्टसुद्धा कॉपी पेस्टच असतात. तीन वर्षे काय केले. याचे मूल्यमापन या प्रोजेक्टमध्ये असते. याकडे विद्यार्थी गांभीर्याने पाहत नाहीत. हे लोण औरंगाबादेतच नाही तर राज्यभरात पसरले आहे. नोकरी न मिळण्याचे हेसुद्धा महत्त्वाचे कारण आहे. या कॉपी-पेस्ट प्रोजेक्टवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**- डॉ. उल्हास शिऊरकर,** संचालक, देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय

### संबंधितांवर कारवाई करा

◆ अभियांत्रिकी शिक्षणातील जर्नल हा महत्त्वाचा भाग आहे. जे कुणी पैसे देऊन लिहून देत असतील त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. अभियांत्रिकीच्या प्राचार्यांनी संबंधित प्रकरणांवर लक्ष द्यावे.

**- सागर साळुंके,** जिल्हाध्यक्ष, एनएसयूआय

### ...भाई, पूना - बंबई का भी हो गया

◆ अभियांत्रिकीसह सर्व प्रकारचे प्रॅक्टिकल तयार करून देणाऱ्या एका दुकानदाराशी 'लोकमत' प्रतिनिधीने ग्राहक बनून संपर्क साधला असता, दोघात झालेला संवाद जशास तसा...

प्रतिनिधी : हमे इंजिनिअरिंग के थर्ड सेमिस्टर का प्रॅक्टिकल चाहिए?

दुकानदार : शहर के पुरे इंजिनिअरिंग कॉलेज के राईट्प्स (प्रॅक्टिकल) हो चुके है...आप कोनसे कॉलेज के हो?

प्रतिनिधी : 'साई' का हू....

दुकानदार : अरे, आप तो व्हीआयपी हो. आप का सब चलता है. आप कल आ जाओ..सब मिल जायेगा.

प्रतिनिधी : रेट कितना है?

दुकानदार : मेरे भाई ५ रुपये से १२ रुपया तक पर पेज है...

प्रतिनिधी : जादा हो रहा है.. कुछ कम करो.

दुकानदार : नही भाई... ८ रुपये से १५ रुपये था. अब कम हो गया है. बंबई, पूना के स्टुडंट को हम इससे जादा लगाते.

प्रतिनिधी : बंबई, पूना के स्टुडंट?

दुकानदार : हा बहोत आते है, उधर का सबमिशन हो गया..आप ने देर कर दी है. कल आ जाओ. रेट और कम कर देगें.

प्रतिनिधी : कल आता हू...

( म्हणत भ्रमणध्वनी बंद केला)

### लाखो रुपयांची उलाढाल

◆ अभियांत्रिकीसह तंत्रनिकेतन, आयटीआय आणि औषधनिर्माणशास्त्रासाठी लागणारे प्रॅक्टिकल रेडिमेड उपलब्ध करून देण्याचा धंदा जोरात आहे. संबंधित महाविद्यालयांचा परिसर, कॅनॉट, उस्मानपुरा आदी भागांत अनेकांनी याच धंद्यासाठी झेरॉक्स, डीटीपी दुकाने उभारली आहेत. या दुकानांमध्ये सर्व काही कॉपी-पेस्ट साहित्य तयार असते. विषय सांगताच दुकानदार विद्यार्थ्यांना हवे त्या प्रकारचे प्रॅक्टिकल उपलब्ध करून देतो. विद्यार्थ्यांनाही कोणतेही कष्ट न करता सहजपणे प्रॅक्टिकल उपलब्ध होते. एका विद्यार्थ्याला ३ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम प्रॅक्टिकलसाठी मोजावी लागते. यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे पाहणीत दिसून आले.



## प्रधान आयकर आयुक्त-२ म्हणून के.पी.सी. राव रुजू

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** औरंगाबाद शहराच्या आयकर विभागात के.पी.सी. राव हे प्रधान आयकर आयुक्त-२ या पदावर रुजू झाले असून, सोमवारी त्यांनी आपला पदभार स्वीकारला. या आधी ते हैदराबाद येथे कार्यरत होते. पदोन्नतीवर त्यांची प्रधान आयकर आयुक्त-२ म्हणून औरंगाबाद येथे बदली झाली आहे. औरंगाबादमध्येच शिवदयाल श्रीवास्तव हे प्रधान आयकर आयुक्त-१ म्हणून सध्या कार्यरत आहेत.



के.पी.सी. राव

नोटाबंदी आणि केंद्र सरकारने घेतलेल्या इतर महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आयकर कार्यालयांत कामाचा व्याप वाढला आहे. या पार्श्वभूमीवर आयकर विभागाला दोन उच्चस्तरीय अधिकारी कार्यरत झाल्यामुळे शहरासह संपूर्ण मराठवाड्यातील करदात्यांना याचा लाभ होईल.

जालना, नांदेड, लातूर, परभणी, बीड या जिल्ह्यांकडे लक्ष देणे अधिक सुलभ होईल. तेथील करदाते व आयकर अधिकाऱ्यांना यामुळे सुविधा होईल. तेथील प्रश्न व समस्यांचे समाधान लवकर करणे शक्य होईल.

# 'फ्युचर मंत्रा' करिअरविषयक चिंता आता सोडा

**उपक्रम :** ११ वी व १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : बारावीनंतर** नेमके काय करावे, हा प्रश्न अनेकांना विचारात टाकणारा आहे. विद्यार्थ्यांनाच नव्हे तर आजकालच्या सुज्ञ पालकांनादेखील याबाबत खूप विचार करावा लागतो. आज केवळ डॉक्टर, इंजिनिअर एवढ्यापुरतेच करिअर मर्यादित राहिले नसून विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक नव्या वाटा खुणावू लागल्या आहेत. ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअरसंबंधी पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे मनोबल उंचविण्यासाठी 'लोकमत' आणि व्हीआयटी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी 'फ्युचर मंत्रा' या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

सन्मित्र कॉलनी येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, म.सा.प. रॉक्सी सिनेमागृहाजवळ येथे सायं. ५ वा. हा कार्यक्रम होईल. १२ वी नंतर नेमके काय करावे, कोणत्या क्षेत्रात स्पेशलायझेशन करावे, योग्य इन्स्टिट्यूट कसे निवडावे, अ‍ॅडमिशनची पद्धती कशी असेल, त्यासाठी आवश्यक तयारी, यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे 'फ्युचर मंत्रा' या कार्यक्रमातून मिळतील.

वाढत्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट करिअर करण्याची युवकांची इच्छाशक्ती असते. या इच्छाशक्तीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली तर यश आपल्याच मुठीत आहे. विद्यार्थ्यांनो कोणतेही मोठे यश मिळविण्यासाठी योग्य वेळी मिळणारी प्रेरणाही तितकीच महत्त्वाची ठरते. या कार्यक्रमात तुम्हाला तज्ज्ञ मंडळींकडून प्रेरणादायी विचार ऐकण्याची संधीही मिळणार आहे.

लोकमत | VIT UNIVERSITY (Estd. u/s 3 of UGC Act 1956)

**Future मंत्रा**

### विद्यार्थी, पालकांसाठी मार्गदर्शक सेमिनार



भुपेश दवे

◆ शिक्षणाच्या या टप्प्यावर भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी 'लोकमत'ने सेमिनारद्वारे विद्यार्थ्यांना एक प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थी आणि पालकांसाठी हे सेमिनार मार्गदर्शक ठरणार असून यादरम्यान व्हीआयटीचे प्रा. विनोदकुमार शर्मा व भुपेश दवे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांनी व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून, अधिक माहितीसाठी ९६६५८०९७७७, ८८५६८००३०१ या क्रमांकावर संपर्क करावा.

**कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :** ◆ आत्मविश्वास व ध्येयनिश्चिती ◆ यशाचे महत्त्व ◆ यशस्वी लोक त्यांच्या आयुष्यात जे हवे ते कसं प्राप्त करु शकतात, याची रहस्य विविध उदाहरणांसह ◆ नियोजन का व कसे करावे? ◆ आपले यश आपल्याच हाती ◆ १२ वी नंतर अभियांत्रिकी शिक्षणाचे (इंजिनिअरिंगचे) महत्त्व ◆ इंजिनिअरिंग क्षेत्रामधील संधी

## पुण्याहून येणाऱ्यांना मनस्ताप

**औरंगाबाद : पुणे-औरंगाबाद** मार्गावर धावणाऱ्या एस. टी. महामंडळाच्या दोन बस गुरुवारी अवघ्या काही मिनिटांच्या अंतराने पंक्चर झाल्या. यावेळी वाहकांनी प्रवाशांशी अरेरावी करीत त्यांना अर्ध्या प्रवासातच उतरवून दिल्याने प्रवाशांना मनस्ताप झाला. ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांची सर्वाधिक गैरसोय झाली. प्रवाशांना अपमानित करणाऱ्या वाहकाला जाब विचारला जाईल, अशी माहिती एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अ‍ॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक — १९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521



